# महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे

प्लॉट नं. आर-७, मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७
फोन : ०२०-२४५२८१०० / २४५२८२००
वेबसाईट : www.msamb.com

## जाहीर सूचना

आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत हंगाम २०२५-२६ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार नाफेड/एनसीसीएफ मार्फत तेलबिया व कडधान्य खरेदी करण्यात येणार आहे. सदर हमीभाव खरेदी प्रक्रिया राबविणेसाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाची "राज्यस्तरीय नोडल संस्था" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यात "खरेदी केंद्र" म्हणून कामकाज करण्यास इच्छुक शेतकरी उत्पादक संस्था/ कंपन्या यांचेकडून यापूर्वी दि. २२/१०/२०२५ रोजीच्या जाहीर सूचनेनुसार प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार प्राप्त प्रस्तावांच्या छाननीअंती पात्र प्रस्ताव राज्य शासनास शिफारस करण्यात आले आहेत. तथापि राज्य शासनाच्या दि. १२/११/२०२५ रोजीच्या व केंद्र शासनाच्या दि. ११/११/२०२५ रोजीच्या पत्रानुसार प्राप्त सुधारित अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे "तेलबिया व कडधान्य खरेदी केंद्र" म्हणून कामकाज करण्यास इच्छुक असणाऱ्या व **दि. १०/११/२०२३ पुर्वी नोंदणी झालेल्या व किमान ३०० पेक्षा जास्त शेतकरी सभासद असणाऱ्या शेतकरी उत्पादक संस्था/कंपन्यांनी** (FPO/FPC) विहित नमुन्यातील परिपुर्ण प्रस्ताव दि. **१९/११/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या संबंधित विभागीय कार्यालयात समक्ष सादर करावेत. यासाठीचे पात्रता निकष व परिपुर्ण प्रस्तावांसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी कृषि पणन मंडळाच्या www.msamb.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

पुणे, दिनांक : १३/११/२०२५

**कार्यकारी संचालक**

**विषय:-हंगाम २०२५-२०२६ चे किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत खरेदी केंद्र सुरु करणेबाबत पात्र शेतकरी उत्पादक संस्था/कंपन्या (FPO/FPC) कडून नव्याने प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**टिप : उपरोक्त विषयात नमूद खरेदी केंद्र मागणीबाबत यापूर्वी दि. २२/१०/२०२५ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन सादर करण्यात आलेले जे प्रस्ताव केंद्रीय संस्थेंकडून मंजूर करण्यात आलेले आहेत त्या व्यतिरीक्त इतर प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाहीत. सबब त्या अर्जदारांनी नव्याने प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.**

## शेतकरी उत्पादक संस्था/ कंपन्यांसाठीचे पात्रता निकष व आवश्यक कागदपत्रे

**१. पात्रता निकष :**

- संस्थेची दि. १०/११/२०२३ पुर्वी नोंदणी झालेली असणे आवश्यक.
- संस्थेचे किमान ३०० पेक्षा जास्त शेतकरी सभासद असावेत.

**२. आवश्यक कागदपत्रे :**

१) खरेदी केंद्र मिळणेबाबत विहीत नमुन्यातील मागणी अर्ज.

२) मॉईश्चर मिटर, चाळणी, ताडपत्री, संगणक, सीसीटीव्ही ची सुविधा, संगणक चालवण्याची क्षमता असलेले जनरेटर, स्कॅनर असलेला स्मार्ट फोन, हमीभाव खरेदी योजनेचा अनुभव असलेला व ऑनलाईन पोर्टल व संगणक हाताळणीचे संपूर्ण ज्ञान असलेला प्रशिक्षित सेवक वर्ग, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, नोडल संस्थेने निश्चित केलेल्या कंपनीची MFS११०(L१) Single Fingerprint Scanner मशिन या सर्व बाबींच्या उपलब्धते बाबत अर्जात उल्लेख आवश्यक.

३) FPO/FPC चे कंपनी रजिस्ट्रार यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र

४) FPO/FPC चे किमान ३०० किंवा जास्त सभासद शेतकरी असल्याबाबत Ministry of Corporate Affairs, Govt. of India यांचे पोर्टलवरुन डाउनलोड केलेली व कंपनी सेक्रेटरी (CS) यांनी प्रमाणित केलेली सभासद शेतकरी यादीची प्रत तसेच FPO/FPC ने सदर पोर्टलवर अपलोड केलेल्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या Form MGT ७A ची प्रत

५) पणन मंडळाने नेमलेल्या समन्वयक संस्थेशी अर्जदार FPO/FPC संलग्न असल्याचा समन्वयक संस्थेने दिलेला दाखला.

६) यापूर्वी शासकिय हमीभाव खरेदी केंद्र म्हणून काम केलेल्या संस्थेस प्राधान्य देण्यात येईल. तथापी अन्नधान्य / कडधान्य / तेलबिया इ. खरेदी विक्री कामकाजाचा अनुभव असलेबाबत NEML कोड, खरेदी हंगाम, पिक यांचे तपशीलासह हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

७) FPO/FPC चे स्वतःचे/भाड्याचे गोदाम असलेबाबत हमीपत्र

८) खरेदी केंद्राच्या गोदामाचा जिओ टॅगींग कोऑर्डिनेटस् सहित फोटो

९) खरेदी केंद्रावर येणारे शेतकरी व इतरांसाठी पिण्याचे पाणी, शौचालय व इतर अनुषंगिक बाबींची व्यवस्था उपलब्ध करुन देणेबाबतचे संमतीपत्र

१०) FPO/FPC च्या मागील २ वर्षांच्या सनदी लेखापाल (CA) यांनी प्रमाणित केलेल्या लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती.

११) यापूर्वी शासकिय खरेदीचे कामकाज केले असल्यास त्यामध्ये गैरव्यवहार/गैरव्यवस्थापन केला नसल्याचे हमीपत्र

१२) आधारभूत किंमत खरेदी योजनेसाठी नाफेडने निश्चित केलेली स्टॅण्डर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर मान्य असल्याबाबत व FPO/FPC वर काळ्या यादीत समावेश/अपहार /फौजदारी गुन्हा या संबंधी कार्यवाही झालेली नसलेबाबत रु. ५००/- चे मुद्रांक पेपरवरील प्रतिज्ञापत्र

१३) पॅनकार्डची प्रमाणित प्रत

१४) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र

१५) FPO/FPC कडून खरेदी / नोंदणी मध्ये गैरव्यवहार / अनियमितता झाल्यास प्रशासकीय व इतर खर्च देय असणार नाही ही अट मान्य असल्याचे संमती पत्र

१६) FPO/FPC करिता खरेदी केंद्र मंजूर झाल्यास अनामत रक्कम रु. १० लाख कृषि पणन मंडळाकडे जमा करणेबाबतचे संमतीपत्र

## हंगाम २०२५-२६ मधील हमीभाव खरेदी केंद्र मिळणेसाठी
## FPO / FPC यांनी नव्याने करावयाच्या अर्जाचा विहीत नमुना

जा.क्र. ....................../२०२५-२६, दि. ........................

**प्रति,**

**मा. कार्यकारी संचालक,**
महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे.

मार्फत -
**मा. उपसरव्यवस्थापक,** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, विभागीय कार्यालय, ...............................

**विषय : हंगाम २०२५-२६ मधील शेतमाल खरेदीसाठीचे हमीभाव खरेदी केंद्र मिळणेबाबत...**
संदर्भ : दै. लोकमत मधील आपली दि. १४/११/२०२५ रोजीची जाहीरात.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपल्या संदर्भिय जाहिरातीस अनुसरुन आमची................................ ....................................... (**FPO/FPC चे नांव**) ता. ........................ जि. .......................... हंगाम २०२५-२६ मधील शासकिय शेतमाल खरेदीसाठी स्वत:चे हमीभाव खरेदी केंद्र चालविण्यास इच्छुक आहे. त्याकरिता आम्ही आमचा खालीलप्रमाणे प्रस्ताव सोबत सादर करीत आहोत.

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १. | **प्राथमिक माहिती** | |
| | १) FPO/FPC चे संपूर्ण नांव, पत्ता व इ-मेल आयडी | |
| | २) FPO/FPC चा नोंदणी क्रमांक व दिनांक | |
| | ३) प्रस्तावित खरेदी केंद्राचे ठिकाण | |
| | ४) खरेदी केंद्राच्या गोदामाचे जिओ टॅगींग कोऑर्डिनेटस् | |
| | ५) अध्यक्षाचे नांव व मोबाईल नं. | |
| | ६) व्यवस्थापकाचे नांव व मोबाईल नं. | |
| | ७) खरेदी केंद्र प्रमुखाचे नांव व मोबाईल नं. | |
| २. | **खरेदी केंद्रावरील सुविधा उपलब्धतेबाबत** | **(होय/नाही)** |
| | १) मॉईश्चर मिटर | |
| | २) धान्य चाळणी | |
| | ३) ताडपत्री | |
| | ४) संगणक व प्रिंटर | |
| | ५) सीसीटीव्ही सुविधा | |
| | ६) Generator/UPS सुविधा | |
| | ७) स्कॅनर असलेला स्मार्ट फोन | |
| | ८) ऑनलाईन पोर्टल व संगणक हाताळणीचे संपूर्ण ज्ञान असलेला प्रशिक्षित सेवक वर्ग. | |
| | ९) इलेक्ट्रॉनिक वजनकाटा | |
| | १०) MFS११०(L१) Single Fingerprint Scanner मशिन | |

| अ.क्र. | तपशिल | जोडले आहे/नाही |
| --- | --- | --- |
| **३.** | **आवश्यक कागदपत्रे** | |
| | १) FPO/FPC चे कंपनी रजिस्ट्रार यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र | |
| | २) FPO/FPC चे किमान ३०० किंवा जास्त सभासद शेतकरी असल्याबाबत Ministry of Corporate Affairs, Govt. of India यांचे पोर्टलवरुन डाउनलोड केलेली व कंपनी सेक्रेटरी (CS) यांनी प्रमाणित केलेली सभासद शेतकरी यादीची प्रत तसेच FPO/FPC ने सदर पोर्टलवर अपलोड केलेल्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या Form MGT 7A ची प्रत | |
| | ३) पणन मंडळाने नेमलेल्या समन्वयक संस्थेशी अर्जदार FPO/FPC संलग्न असल्याचा समन्वयक संस्थेने दिलेला दाखला. | |
| | ४) यापूर्वी शासकिय हमीभाव खरेदी केंद्र म्हणून काम केलेल्या संस्थेस --- वर्षे अन्नधान्य/कडधान्य/तेलबिया इ. खरेदी-विक्री कामकाजाचा अनुभव असलेबाबत NEML कोड, खरेदी हंगाम, पिक यांचे तपशीलासह हमीपत्र. | |
| | ५) FPO/FPC चे स्वतःचे/भाड्याचे गोदाम असलेबाबत हमीपत्र | |
| | ६) खरेदी केंद्राच्या गोदामाचा जिओ टॅगींग कोऑर्डिनेटस् सहित फोटो | |
| | ७) खरेदी केंद्रावर येणारे शेतकरी व इतरांसाठी पिण्याचे पाणी, शौचालय व इतर अनुषंगिक बाबींची व्यवस्था उपलब्ध करुन देणेबाबतचे संमतीपत्र | |
| | ८) FPO/FPC ची मागील २ वर्षाचे सनदी लेखापाल (CA) यांनी प्रमाणित केलेल्या लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती. | |
| | ९) यापूर्वी शासकिय खरेदीचे कामकाज केले असल्यास त्यामध्ये गैरव्यवहार/गैरव्यवस्थापन केला नसल्याचे हमीपत्र | |
| | १०) आधारभूत किंमत खरेदी योजनेसाठी नाफेडने निश्चित केलेली स्टॅण्डर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर मान्य असल्याबाबत व FPO/FPC वर काळ्या यादीत समावेश/अपहार/फौजदारी गुन्हा या संबंधी कार्यवाही झालेली नसलेबाबत रु. ५००/- चे मुद्रांक पेपरवरील प्रतिज्ञापत्र | |
| | ११) पॅनकार्डची प्रमाणित प्रत | |
| | १२) जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र | |
| | १३) FPO/FPC कडून खरेदी / नोंदणी मध्ये गैरव्यवहार / अनियमितता झाल्यास प्रशासकीय व इतर खर्च देय असणार नाही ही अट मान्य असल्याचे संमती पत्र | |
| | १४) FPO/FPC करिता खरेदी केंद्र मंजूर झाल्यास अनामत रक्कम रु. १० लाख कृषि पणन मंडळाकडे जमा करणेबाबतचे संमतीपत्र | |

तरी कृपया आमचा प्रस्ताव मंजूर करुन आमच्या .................................................................. .......................................................... या FPO/FPC ला हंगाम २०२५-२६ मध्ये शासकिय हमीभाव खरेदी केंद्र चालविण्याकरीता मंजूरी मिळावी ही विनंती.

आपले विश्वासू,

**व्यवस्थापक** **अध्यक्ष**

**FPO/FPC, ......................... (सही/शिक्का)**